# पोटनियम दुरुस्ती

| पोटनियमाचा अनु. नंबर | दुरूस्ती पूर्वीच्या पोटनियमाची शब्दरचना | दुरुस्ती झाल्यानंतर होणाऱ्या पोटनियमाची शब्दरचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| क. १.३ | **अधिकृत भागभांडवल :-**<br>संस्थेचे अधिकृत भागभांडवल रूपये ७५,००,००,०००/- (रू.पंच्याहत्तर कोटी) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रू १५००/-(रू. एक हजार पाचशे फक्त) राहील. व या रक्कमेत वाढ करण्याचा अधिकार वार्षिक सभेच्या मान्यतेने संचालक मंडळास राहील. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २८ मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता तथापि प्रत्येक सभासदास रूपये २०००००/- (अक्षरी रूपये दोन लाख) पर्यंत आणि शासकिय परिपत्रके याप्रमाणे भाग धारण करता येईल. व त्या पुढील त्याची दरमहा येणारी रक्कम काटकसर निधीमध्ये घेता येईल काटकसर निधी मध्ये घ्यावयाची रक्कम प्रत्येक सभासदांची दरमहा नियमितपणे संस्थेला सभासदांचे वेतनातून कपात करून घेण्याचा अधिकार संस्थेला राहिल व त्यावर व्याज दरवर्षीचा लाभांश दराप्रमाणे दिले जाईल. तसेच रू.२/- लाख मर्यादा पूर्ण झालेल्या सभासदाकडून कर्ज मागणी केल्यानंतर प्रत्येक मंजूर कर्ज रक्कमेतून १० टक्के काटकसरनिधी रक्कम कापून घेण्यात येईल. व त्यावर व्याज दरवर्षीच्या लाभांश दराप्रमाणे दरवर्षी दिले जाईल. | **अधिकृत भागभांडवल :-**<br>संस्थेचे अधिकृत भागभांडवल रूपये १००,००,००,०००/- (रू. शंभर कोटी) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रू २०००/-( दोन हजार फक्त) राहील. व या रक्कमेत वाढ करण्याचा अधिकार वार्षिक सभेच्या मान्यतेने संचालक मंडळास राहील. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २८ मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता तथापि प्रत्येक सभासदास रूपये ५०००००/- (अक्षरी रूपये पाच लाख) पर्यंत आणि शासकिय परिपत्रके याप्रमाणे भाग धारण करता येईल. व त्या पुढील त्याची दरमहा येणारी रक्कम काटकसर निधीमध्ये घेता येईल काटकसर निधी मध्ये घ्यावयाची रक्कम प्रत्येक सभासदांची दरमहा नियमितपणे संस्थेला सभासदांचे वेतनातून कपात करून घेण्याचा अधिकार संस्थेला राहिल व त्यावर व्याज दरवर्षीचा लाभांश दराप्रमाणे दिले जाईल. तसेच रू.५/- लाख मर्यादा पूर्ण झालेल्या सभासदाकडून कर्ज मागणी केल्यानंतर प्रत्येक मंजूर कर्ज रक्कमेतून १० टक्के काटकसरनिधी रक्कम कापून घेण्यात येईल. व त्यावर व्याज दरवर्षीच्या लाभांश दराप्रमाणे दरवर्षी दिले जाईल. | संस्थेच्या भाग भांडवलात वाढ व्हावी म्हणून व सभासदांच्या कर्जाची वाढती गरज लक्षात घेता तसेच सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांचे जा. क्र. १४८४/२०२४ दि. २० मे २०२४ चे नुसार शासन अधि सुचना दि. २४ एप्रिल २०२४ ने सभासदांना वैयक्तिक भाग धारण मर्यादा ५.०० लाख (अक्षरी रुपये पाच लाख) पर्यंत वाढविल्याने |
| फ. १.८ | संस्थेचे कामकाजाचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा आहे. | संस्थेचे कामकाजाचे कार्यक्षेत्र पुणे महसुल विभाग अंतर्गत म्हणजेच पुणे/सातारा / सांगली / सोलापुर / कोल्हापुर असे राहील. | सभासदांची मागणीनुसार संस्था वाढीसाठी. |
| आय.१.९ | चिटणीस किंवा व्यवस्थापक समितीने ह्या बाबतीत अधिकृत केलेला तिचा एखादा सदस्य यांनी रूपये १०००/- पेक्षा जास्त किंवा निबंधकाची पूर्वसंमती घेऊन व्यवस्थापक समितीने ठेवावयास सांगितलेल्या रक्कमेपेक्षा अधिक रक्कम आपणाजवळ ठेवू नये. उपरोक्त मर्यादेपेक्षा जास्त असलेली रोख शिल्लक संस्थेच्या शिल्लकेवर ताबा असलेल्या अधिकाऱ्याने ताबडतोब बँकेत किंवा तिच्या अगदी जवळ असलेल्या शाखेत भरली पाहिजे. | चिटणीस किंवा व्यवस्थापक समितीने ह्या बाबतीत अधिकृत केलेला तिचा एखादा सदस्य यांनी रूपये २५०००/- पेक्षा जास्त किंवा निबंधकाची पूर्वसंमती घेऊन व्यवस्थापक समितीने ठेवावयास सांगितलेल्या रक्कमेपेक्षा अधिक रक्कम आपणाजवळ ठेवू नये. उपरोक्त मर्यादेपेक्षा जास्त असलेली रोख शिल्लक संस्थेच्या शिल्लकेवर ताबा असलेल्या अधिकाऱ्याने ताबडतोब बँकेत किंवा तिच्या अगदी जवळ असलेल्या शाखेत भरली पाहिजे. | शासकीय कार्यालयांचा भरणा जास्त असलेने वाहनभत्ता देणेसाठी रक्कम लागत असलेने. |